नं. १२

म. ग्रं. सं. ठाणें

विषय
भाषा व्याकरण

संग्रहालय क्रमांक
२०

लेखक प्र. बा. रा. शास्त्री
ठकार - पुणे.

सन
१८६४.

पुस्तकाचें नांव मराठी शुद्ध लिहिण्याविषयीं
अनुगम

१२
सांक्र

# मराठी शुद्ध लिहिण्या विषयी अनुगम

(भा. व्या.)

१८४४
म. ग्रं. सं. ठाणें
भाषा-व्याकरण
20

आवृत्ति २री

# प्रारंभ.

# मराठी शब्द लिहिण्याविषयीं अनुक्रम.

शाळांच्या उपयोगा करितां

केला

तो,

रजिस्तर करून

मुक्काम पुणें

येथें

बाळकृष्ण रामचंद्र शास्त्री ठकार

यांच्या छापखान्यांत

छापिला.

आवृत्ति दुसरी.

शके १७८६

इसवी सन १८६४

किमत ८= .

# अनुक्रमणिका.


पृष्ठ.

१ वर्ण. ---------------------------------- २

२ सामान्य रूपांविषयीं कोष्टकें. -------------- ४

३ अनुस्वारा विषयीं नियम. ------------------ ६

४ ऱ्हस्वदीर्घां विषयीं नियम. ---------------- १६

५ अव्ययां विषयीं नियम. -------------------- २८

६ अव्ययें. ----------------------------------

- शब्दयोगी अव्ययें. ------------- ३१
- उभयान्वयी --------------------- ३१
- क्रियाविशेषण. ------------------ ३१
- केवलप्रयोगी. ------------------- ३२

७ उपसर्ग. ---------------------------------- ३४

८ प्रत्यय. ---------------------------------- ३५

९ कठिण शब्द. ------------------------------- ३५

७३१

# मराठीशुध्दलिहिण्या विषयीं अनुगम.

१ मराठी भाषाबालबोधलिपींत लिहितांना मुख्यत्वें दोन तीन गोष्टीं कडे लक्ष्य दिलें पाहिजे.

पहिली, — अनुस्वार कोठें द्यावा.

दुसरी, — कोणतीं अक्षरें ऱ्हस्व व कोणतीं दीर्घ लिहावीं.

तिसरी, — संस्कृत भाषेंतील व इतर भाषेंतील शब्द मराठींत आले आहेत. ते कसे लिहावे.

२ अनुस्वाराविषयीं, ऱ्हस्व दीर्घां विषयीं, व संस्कृतांतील शब्दां विषयीं बरेच नियम बांधतां येतात. त्या नियमांचें निरूपण करण्या पूर्वीं मराठी भाषेंत वर्ण किती व त्यांचे उच्चा

र कसे होतात आणि शब्दांचीं सामान्यरूपें कशीं होतात तीं सांगतों.

३ वर्ण एकंदर बावन्न आहेत, त्यांचे दोन भेद.

१ स्वर, २ व्यंजनें.

४ स्वरांत भेद दोन आहेत.

१ ह्रस्वस्वर— अ, इ, उ, ऋ, ऌ, अं आणि अः

२ दीर्घस्वर— आ, ई, ऊ, ॠ, ॡ, ए, ऐ, ओ, आणि औ.

५ व्यंजनें छत्तीस आहेत त्यांचे उच्चार-

---

टीप- ऋ, ॠ आणि ऌ, ॡ हे स्वर बहुधा मराठींत येत नाहींत.

टीप- ए, ऐ आणि ओ औ ह्यास्वरांसकोणी संयुक्त स्वर ह्मणतात.

टीप- अं आणि अः हे अनुस्वार व विसर्ग यांचे उपलक्षक आहेत. हे स्वराश्रित आहेत ह्मणून अवघ्या स्वरांस लागतात.

येणें प्रमाणें.

| कंठ्य | तालव्य | मूर्धन्य | दंत्य | ओष्ठ्य | दंतौष्ठ्य | जोडाक्षरें |
|---|---|---|---|---|---|---|
| क | च | ट | त | प | व | क्ष |
| ख | छ | ठ | थ | फ | | ज्ञ |
| ग | ज | ड | द | ब | | |
| घ | झ | ढ | ध | भ | | |
| ङ | ञ | ण | न | म | | |
| ह | य | र | ल | | | |
| | श | ष | स | | | |
| | | ळ | | | | |

६ च, छ, ज आणि झ ह्या व्यंजनांचा दंत तालव्य ही उच्चार होतो. जसें,

चव + इच्छा ) ह्या शब्दांत च, छ, ज, व, झ ह्यां-

* यांतील छचा उच्चार संस्कृताप्रमाणें तालव्य असतां कोणी दंत तालव्य करतात

जड
झरा. } चा उच्चार दंततालव्य जाणावा.

७ अनेक व्यंजनें व एक स्वर मिळून जीं अक्षरें होतात तीं जोडाक्षरें.

## सामान्यरूपें.

### पुल्लिंग.

| अंत | सा.रू. | उदाहरणें. |
|---|---|---|
| अ | आ | देवास-रसिकांचा. |
| आ | या | वाड्यास-रेड्यांचा. |
| इ | ई | कवीस. |
| ई | या | वाण्यास-कसब्यांचा. |
| उ | ऊ | गुरूस. |
| ऊ | ऊ | नारूस. |
| | किं॰ वा | नारवास-लाडवास. |

मराठी ग्रंथसंग्रहालय, ... संस्थेस नजर
... पटवर्धन
...-१०-२२.

# स्त्रीलिंग.

| अंत | ए.व. | ब.व. | उदाहरणें. |
|---|---|---|---|
| अ | ए किं. | आ | विजेस - विजांस. |
| | इ | ई | बहिणीस-बहिणींस. |
| आ | ए किं. आ | आ | रमेस-रमास-मुद्रेस-मुद्रांस. |
| इ | ई | ई | मतीस - कीर्तीस. |
| उ | ऊ | = | धेनूनें. |
| उ | ऊ | वा | ऊस - उवांस. |
| ओ | ओ | आ | बायकोस-बायकांस |

## नपुंसकलिंग.

| अंत. | सा॰ रू॰ | उदाहरणें. |
|---|---|---|
| अ | आ | मिठास - ज्ञानांचा. |
| इ | या | पाण्यास - लोण्यास. |
| ऊ | आ | वांसरास. |
| ए | या | पागोट्यास. |

## अनुस्वाराविषयींनियम.

८ नामें.

१ तृतियांत नामाच्या शेवटील अक्षरा वर एक वचनीं व बहुवचनीं अनुस्वार द्यावा. जसें,

ए॰ - माणसानें, पुस्तकाशीं, हस्तें,

स्मरणार्थ,
ग्रंथसंग्रहालय ठाणें,
नजर.
पटवर्धन

मुख्यत्वें, इत्यादि.

ब० – माणसांनीं, पुस्तकांशीं, हस्तांहीं.

२ सप्तम्यंत नामाच्या शेवटील अक्षरा वर अनुस्वार द्यावा, व "आंत" हा प्रत्यय लागून सप्तमीचें रूप झालें असेल तर त्याच्या सामान्यरूपावर अनुस्वार द्यावा. जसें,

पहिलाप्रकार– घरीं जनीं, पदरीं इ०

दुसराप्रकार– घरांत, जनांत, पदरांत, देवळांत इत्यादि.

३ प्रथमा व सप्तमी खेरीज करून इतर विभक्ति लागल्या असतां पुल्लिंगी व स्त्रीलिंगी नामांच्या सामान्यरूपावर बहुवचनीं अनुस्वार द्यावा. जसें,

द्वि०, देवांस, देवींस.
तृ०, देवांनीं, देवींनीं
च०, देवांना-ला-स, देवींना-ला, स. इत्यादि.
पं०, देवांहून-पासून- देवींहून-पासून, इत्यादि.
ष०, देवांचा, देवींचा. इत्यादि.

३ नपुंसकलिंगी बहुवचनीं नामास प्रथमा विभक्ति असतां बहुवचनीं त्याच्या अंत्य अक्षरावर अनुस्वार द्यावा. व इतर विभक्ति असतां त्याच्या सामान्यरूपावर अनुस्वार द्यावा.

प्र० घोडीं, लेंकरें, लांकडें, मोत्यें इ०
द्वि० घोड्यांस, लेंकरांस, लांकडांस, मोत्यांस, इ०

[library stamp]

तृ० घोड्यांनीं, लेंकरांनीं, लाकडांनीं, इ०.
च० घोड्यांना, ला, स. लेंकरांस, ला, स.
पं०- घोड्यांहून, पासून. लेंकरांहून इत्यादि.

५ ईकारांत, ऊकारांत व एकारांत नपुंसक लिंगी नामाच्या एक वचनीं ही अंत्याक्षरा वर अनुस्वार द्यावा. जसें,

दहीं, लोणी, इत्यादि.
कोंकरूं, वांसरूं इत्यादि

६ एकारांत धातुसाधित नामा चा अंत्यस्वर नेहेमीं सानुस्वार असतो. जसें,

करणें, मारणें, बोलणें, इ०

७ पुढें नपुंसकलिंगी प्रथमांत नाम-

असतां मागील षष्ठ्यंतनामा वर-
एकवचनीं व बहुवचनीं विशेषणा
प्रमाणें अनुस्वार द्यावा. जसें,

सागाचें लांकूड, सागाचीं लां
कडें, रामाचें पागोटें, रामाचीं-
पागोटीं.

९ विशेषणें.

१ नपुंसकलिंगी नामाच्या आकारांत
विशेषणा वर एकवचनीं व बहुवच-
नीं अनुस्वार द्यावा. जसें,

काळें घोडें, काळीं घोडीं, चांगलें
वांसरूं, चांगलीं वांसरें इत्यादि.

२ अकारांत विशेषणास हा नियम-
लागू नाहीं. तीं प्राकृत संख्या वाचक,
संस्कृत किंवा इतर भाषेंतील असोत.

सं. भा. सं. ... ग्रं. ...

जसें,

वाईट घोडें, एक घोडें, चमत्कारिक घोडें, वलख घोडें.

३ परंतु शतवाचक शे हा शब्द ज्याच्या पुढें लागतो अशीं जीं संख्या विशेषणें त्यांच्या अंत्या वर नेहेमीं अनुस्वार द्यावा. जसें,

दोनशें घोडीं, तीनशें मुलें, चारशें जनावरें इत्यादि.

१० सर्वनामें.

पुरुषवाचकसर्वनामें.

| एकवचन. | बहुवचन. |
|---|---|
| प्र० मी | आम्ही. |
| द्वि० तूं | तुम्ही. |
| तृ० तो, ती, तें. | ते, त्या, ती. |

## दर्शकसर्वनामें.

| | एकवचन. | बहुवचन. |
|---|---|---|
| पु० | हा, तो. | हे, ते. |
| स्त्री० | ही, ती. | ह्या, त्या. |
| न० | हें, तें. | हीं, तीं. |

## संबंधीसर्वनामें.

| | एकवचन. | बहुवचन. |
|---|---|---|
| पु० | जो. | जे. |
| स्त्री० | जी. | ज्या. |
| न० | जें. | जीं. |

## प्रश्नार्थकसर्वनामें.

कोण, काय, किती इत्यादि.

## सामान्यसर्वनामें.

कांहीं, सर्व, अमूक, कोणी इत्यादि.

सर्वनामास द्वितीयादि विभक्ति लाग

ल्या असतां बहुवचनीं त्या वर अनुस्वार द्यावा. तृतीयाविभक्ति असतां बहुवचनीं दोन्ही अक्षरां वर अनुस्वार द्यावा. जसें.

१ आम्हांस, आम्हीं आम्हां पासून, आम्हांत. त्यांनीं.*

२ तुम्हांस, तुम्हीं, तुम्हांपासून, तुम्हांत. त्यांनीं.*

११ क्रियापदें.

१ कर्मणिप्रयोगांत नपुंसकलिंगी कर्म असतां एक वचनीं व बहुवचनीं क्रियापदाच्या अंत्या वर अनुस्वार द्यावा. जसें,

*टीप. मी व तूं ह्यांची षष्ठी बहुवचनीं आमची व तुमची अशी होते.

त्यानें काम केलें. त्यानें कामें
केलीं.
त्यानें घोडें घेतलें. त्यांनीं घो
डीं घेतलीं.
त्यानें वांसरूं विकलें. त्यानें
वांसरें विकलीं.
त्यानें मोतीं घेतलें. त्यानें मो
त्यें घेतलीं.

२ कर्तरिप्रयोगांत नपुंसकलिंगीक
र्ता असतां एकवचनीं क्रियापदा-
च्या शेवटील वर्णावर अनुस्वार-
द्यावा. जसें,

घोडें चालतें, घोडें चाललें, घो
डीं चाललीं. कापड मळलें,
कापड जळालें, कापडें जळालीं.

३ भावीप्रयोगांत व भावकर्तरिप्र योगांत क्रियापदाच्या शेवटील अक्ष रा वर अनुस्वार द्यावा. जसें,

रामानें रावणास मारलें, कळम- ळतें इत्यादि.

४ धातूस ऊ प्रत्यय लागून जीं अ- व्ययें होतात त्यांज वर अनुस्वार द्या- वा. जसें,

करूं लागला, मारूं लागला, र डूं लागला. इत्यादि.

५ प्रथम पुरुषीं कर्ता असतां वर्त- मानकाळीं व भूतकाळीं अकर्मक धा- तु असल्यास क्रियापदाच्या अंत्या वर एक वचनीं व बहुवचनीं अनुस्वा र द्यावा, तसेंच भविष्यकाळीं बहुवच

नीं अनुस्वार द्यावा, तसेंच भविष्य-
काळींबहुवचनीं मात्र अनुस्वार द्या-
वा. जसें,

मी आहें. मी होतों.

आम्ही आहों, आम्ही होतों, आम्ही
जाऊं.

मी काम करीत आहें, आम्ही काम-
करीत आहों, आम्हीकरूं.

६ द्वितीयपुरुषीं कर्ता असतां वर्तमा
नकाळीं व धातु अकर्मक असतां भू
तकाळीं बहुवचनीं अनुस्वार द्यावा.
जसें, तुम्हीं आहां, तुम्हीं होतां. इ०

हस्वदीर्घांविषयींनियम.

१२ ह्रस्व इकारांतनामें.

१ ह्रस्वइकारांत प्राकृत नामें नाहींत.

जीं ऱ्हस्व इकारांत संस्कृत नामें आ हेत तीं प्रथमा विभक्ति असतां एक वचनीं व बहुवचनीं ऱ्हस्व लिहावीं.+

| एकवचन. | बहुवचन. |
|---|---|
| प्रीति. | प्रीति. |
| कृति. | कृति. |

२ द्वितीयादि विभक्ति लागल्या अ सतां हीं नामें दीर्घ लिहावीं. जसें,

द्वितीया, प्रीतीस, कृतीस.

तृ॰ प्रीतीनें, कृतीनें.

च॰ प्रीतीला, कृतीला.

पं॰ प्रीतीपासून, कृतीपासून.

ष॰ प्रीतीचा, कृतीचा.

---

+ टीप. दीर्घही लिहिण्याचा कचित् सांप्रदाय आहे.

स० भीतींत, छतींत.

ज्या ऱ्हस्व इकारांत नामाचा मराठींत वारंवार लिहिण्याचा प्रसंग येतो त्यांची याद.

वसति. प्रकृति. विश्रांति. शक्ति. कीर्ति. बुद्धि. भक्ति. विभक्ति. संधि. अग्नि. प्रीति. जाति. कृति. स्मृति. रुचि. शुद्धि. मति. कांति. प्राप्ति. रति. संपत्ति. इत्यादि.

१३ दीर्घ ईकारांत नामें.

१ प्राकृत व संस्कृत दीर्घ ईकारांत नामें कोणतीही विभक्ति लागली असतां दीर्घ लिहावीं. जसें,

प्र० काठी, माडी, नदी, देवी.

द्वि० काठीस, माडीस, नदीस, देवीस.

तृ० काठीनें, माडीनें, नदीनें, देवीनें.

च० काठीला, माडीला, नदीला, देवीला.

पं० काठीपा०, मा०पा०, न०पा०, देवीपा०

ष० काठीचा, माडीचा, न०चा, दे०चा.

स० काठींत, माडींत, नदींत, देवींत.

दीर्घ ईकारांत संस्कृत नामांची याद.

लक्ष्मी. श्री. दासी. नारी. सिंही. मंत्री. शूद्री. ब्राह्मणी. शास्त्री. गोपी. करी. कुमारी. इत्यादि.

१४ ऱ्हस्व उकारांत नामें,

१ (ऱ्हस्व उकारांत नामें प्राकृतांत नाहींत.)*

ऱ्हस्व उकारांत संस्कृत नामें प्रथमा विभक्ति असतां एकवचनीं व बहुवचनीं ऱ्हस्वच लिहावीं.

---

* टीप. दीर्घही लिहिण्याचा क्वचित संप्रदाय आहे.

| एकवचन. | बहुवचन. |
|---|---|
| साधु. | साधु. |
| गुरु. | गुरु. |
| शत्रु. | शत्रु. |

१ ह्या नामांस द्वितीयादि विभक्ति लागल्या असतां तीं दीर्घ लिहावीं. जसें,

द्वि० साधूस, गुरूस, शत्रूस.

तृ० साधूनें, गुरूनें, शत्रूनें.

च० साधूला, गुरूला, शत्रूला.

पं० साधूपासून, गुरूपा० शत्रूपा०

ष० साधूचा, गुरूचा, शत्रूचा.

स० साधूंत, गुरूंत, शत्रूंत.

ऱ्हस्व उकारांत नामांची याद.

भानु. वायु. सिंधु. धेनु. विष्णु. विधु. भृगु. इत्यादि.

१५ दीर्घ ऊकारांत नामें.

१ प्राकृत व संस्कृत दीर्घ ऊकारांत ना-
में, कोणतीही विभक्ति लागली अ-
सतां दीर्घ लिहावीं. जसें,

प्र० नारू, पेरू, विसू, भू.
द्वि० नारूस, पेरूस, विसूस, भूस.
तृ० नारूनें, पेरूनें, विसूनें, भूनें.
च० नारूला, पेरूला, विसूला, भूला.
पं० नारूपासून, पेरूपा०, वि०पा०, भूपा.
ष० नारूचा, पेरूचा, विसूचा, भूचा.
स० नारूंत, पेरूंत, विसूंत, भूंत.

दीर्घ ऊकारांत नामांची याद.

वधू, चमू, भ्रू इत्यादि.

१६ उपांत्य जे दीर्घ ईकार व ऊकार ते द्वि-
तीयादि विभक्ति पुढें लागली असतां ह्र

त्म होतात. जसें,

प्र० मीठ, मूळ.

द्वि० मिठास, मुळास.

तृ० मिठानें, मुळानें.

च० मिठाला, मुळाला.

पं० मिठापासून, मुळापासून.

ष० मिठाचा, मुळाचा.

स० मिठांत, मुळांत.

असल्या शब्दांची याद.

सूळ, भूक, सूप, जांभूळ, माळीण, कूळ, शीप, सूप, काबीळ, कूप, बीट, दूध, गूळ, तूप इत्या० मराठी अकारांत शब्दाचें उपांत्य अक्षर इ किंवा उ असल्यास तें सर्वदा दीर्घच असतें.

१७ सर्वनामें.

(ह्रस्व इकारांत सर्वनामें नाहींत.)

दीर्घ ईकारांत चार आहेत तीं हीं.

१ मी. २ ती. ३ जी. ४ ही.

१ "मी" ह्याचीं ह्रस्व दीर्घ रूपें होत नाहींत व इतर तीन सर्वनामास - द्वितीयादि विभक्ति लागल्या असतां अशीं रूपें होतात.

* प्र० ती, जी, ही.

द्वि० तीस, जीस, हीस.

तृ० तिनें, जिनें, हिनें.

च० तिला, जिला, हिला.

पं० तीपासून, जीपासून, हीपासून.

ष० तिचा, जिचा, हिचा.

स० तींत, जींत, हींत.

---

* टीप. तृ० च० ष० ह्या विभक्ति लागल्या असतां -ह्रस्व. प्र० द्वि० पं० आणि स० ह्या विभक्ति लागल्या असतां दीर्घ.

१८ (ऱ्हस्व उकारांत सर्वनामें नाहींत.)

दीर्घ ऊकारांत एक आहे

त्याचीं रूपें.

प्र० तूं.

द्वि० तुला.

तृ० तूं-त्वां.

च० तूंज तुला.

पं० तूंपासून तुजपासून.

ष० तुझा-तुमचा.

स० तुझ्यांत. तुमच्यांत.

१९ विशेषणें.

ऱ्हस्व इकारांत विशेषणें.

१ (ऱ्हस्व इकारांत विशेषणें प्राकृतांत नाहींत.) ऱ्हस्व इकारांत संस्कृत विशेषणें ऱ्हस्वच लिहावीं. जसें,

१ इत्यादि. सुबुद्धि इ०

ऱ्हस्व इकारांत संस्कृत विशेषणांची याद.

अचिंत्यशक्ति, उदारबुद्धि, दीर्घदृष्टि, प्रचंडमति, इत्यादि.

२० दीर्घ ईकारांत विशेषणें.

१ संस्कृत व प्राकृत दीर्घ ईकारांत विशेषणें दीर्घच लिहावीं.

सुखी, दुःखी, अज्ञानी, आळशी.

दीर्घ ईकारांत संस्कृत विशेषणांची याद.

पराक्रमी, परोपकारी, विजयी, प्रतापी, यशस्वी, इत्यादि.

२१ ऱ्हस्व उकारांत विशेषणें.

१ (प्राकृतांत नाहींत.) संस्कृत ऱ्हस्व

उकारांत विशेषणें ऱ्हस्वच लिहावीं.
जसें, दयासिंधु महाबाहु इत्यादि.
संस्कृत ऱ्हस्व उकारांत विशेषणां-
चीं याद.
दयालु कृपालु इत्यादि.

२२ दीर्घ ऊकारांत विशेषणें.

१ प्राकृत व संस्कृत दीर्घ ऊकारांत वि
शेषणें दीर्घच लिहावीं. जसें.
विश्वासू, भोंदू.
संस्कृत दीर्घ ऊकारांत विशेषणां
ची याद.
स्वयंभू इत्यादि.

२३ क्रियापदें.

(ऱ्हस्व इकारांत क्रियापदें नाहींत.)
दीर्घ ईकारांत क्रियापदें.

१ क्रियापदांचे अंत्य व उपांत्य इकार व उकार नेहेमीं दीर्घच असतात. जसें, जाती, नेती, येती, बसती, वाचती, गेली, आली, नेली, बसली, उठली, जाईल, येईल, नेईल, आणीक इत्यादि.

२ कांहीं द्व्यक्षर अकारांत धातु आहे त त्यांस इतर प्रत्यय लागले असतां त्यांच्या आरंभींचें दीर्घ अक्षर र्‍हस्व होतें जसें,

वीक धातु. विकलें-विकरी-विकणें.

वीण

शीज

फीर

नीज इत्यादि.

लूट-लुटलें, लुटला, लुटारूपणा,

ऊर.

सूर.

सूळ.

कूट. इत्यादि.

## अव्ययांविषयीं कांहीं अनुस्वाराचे व ऱ्हस्वदीर्घांचे नियम.

२५ वर्तमान काळवाचक धातुसाधित अव्ययांच्या अंत्यावर अनुस्वार द्यावा व जीं ना प्रत्यय लागून झालीं असतात त्यांच्या उपांत्यावर अनुस्वार द्यावा. जसें,

करितां — करितांना.

देतां — देतांना.

घेतां — घेतांना.

असतां — असतांना.

इत्यादि.

२५ नामांस शब्दयोगी अव्ययें लागलीं असतां नामाच्या सामान्य रूपावर बहुवचनीं अनुस्वार-द्यावा.जसें,

पुस्तकांवर. पुस्तकांसाठीं.
मुलांकरितां. देवांसाठीं.
इत्यादि.

२६ तसेंच सर्वनामास शब्दयोगी अव्ययें लागलीं असतां बहुवचनीं त्यांच्या सामान्य रूपावर अनुस्वार द्यावा. जसें,

ज्यांवर,ज्यांसाठीं,ज्यांकरितां.
त्यांवर, त्यांसाठीं, त्यांकरितां.
ह्यांवर,ह्यांखालीं,ह्यांमागें इत्यादि.

२७ ऊनप्रत्ययांत धातुसाधित अव्ययें.

१ ऊन प्रत्ययांत धातुसाधित अव्ययें नेहेमीं दीर्घच असावीं. जसें,

| धातु | प्रत्यय | शब्द. |
| --- | --- | --- |
| कर | ऊन | करून. |
| मर | --- | मरून. |
| लाग | --- | लागून. |
| राहा | --- | राहून. |
| बस | --- | बसून. |
| | | इत्यादि. |

२ वकारांत धातूंस ऊन प्रत्यय लागला असतां वून असें रूप होतें. जसें,

| धातु. | साधितरूप. |
| --- | --- |
| जेव | जेवून |
| धाव | धावून |
| करीव | करवून |
| मारीव | मारवून |
| | इत्यादि. |

२८ शब्दयोगी अव्ययें.

वर, खालीं, पुढें मागें, आंत मध्यें, बाहेर, कडे, पर्यंत, साठीं, करितां, कारणें, नंतर, पूर्वीं, समोर, सभोंवतें, ठायीं, मुळें, कडे, करवीं, जवळ, पाशीं, प्रत, पलिकडे, पावेतों, बद्दल, ऐवजीं, प्रमाणें, सन्निध, स्तव, विषयीं.

२९ उभयान्वयी अव्ययें.

आणि, ह्मणून, आणखी, परंतु, व, पण, का कीं, जबहुत करून, यद्यपि, तथापि, अथवा, किंवा, जरीं, तरीं, जर, तर, कीं.

३० क्रियाविशेषण अव्ययें.

येथें, तेथें, जेथें, कोठें, येव्हां, तेव्हां, जेव्हां, केव्हां, कधीं, इकडे, तिकडे, आज, उद्यां, काल, परवां, तेरवां, एरवां, आतां, मग, मागून, पुढून, यंदां, सांप्रत, कदाचित्, क्वचित् प्रायः, प्रायशः, पुनः, अतः

पर, निःसंशय, एकदां, वारंवार, सदां, फार, बाईट, कमी, जास्ती, थरथरां, करकरां, भडभडां, सरसरां, कुरकुर, पटकून, इपकून, झटकून, चटकून.

३१ केवल प्रयोगी अव्ययें.

छिः अः उः

३२ मराठींत कांहीं शब्द अर्थभेदें करून भिन्न रीतीनें लिहावे लागतात.

असल्या शब्दांची याद.

| शब्द. | अर्थ. | शब्द. | अर्थ. |
| --- | --- | --- | --- |
| जंव. | (जोंपर्यंत.) | जव | (धान्यविशेष.) |
| पांच. | ( संख्या. ) | पाच | ( वनस्पति. ) |
| नांव. | ( नाम. ) | नाव | ( नदींतली. ) |
| वांचणें. | ( जिवंतअस० ) | वाचणे | (पुस्तकवाच०) |
| तांट. | ( तरू. ) | ताट | (जेवण्याचें ) |

धांव. (देवाची.) घाट. (पर्वत.)
कांप. (हालणें.) काप. (भूषण.)
कांच. (भिंग.) काच. (जाच.)
मांस. (मासकंड.) मास. (महिना.)
वांक. (भूषण.) वाक. (दोरीचा.)
वांटणें. (भागकरणें.) वाटणें. (घोटणें.)
समयीं. (वेळेस.) समई. (दिव्याची.)
कांकूं. (मागेंघेणें.) काकू. (चुलती.)
कांकीं. (उभ० अव्य.) काकी. (चुलती.)
कांकां. (उभ० अव्य.) काका. (चुलता.)
ग्रह. (नक्षत्र.) गृह. (घर.)
आंस. (धुरा.) आस. (आशा.)
मत्त. (दांडगा.) मत. (अभिप्राय.)
भट्ट. (भिक्षुक.) भट. (योद्धा.)

३३ कितीएक शब्दांचा उच्चार बहुतांच्या तों

डांत सानुस्वार होत नाहीं परंतु ते सानुस्वार लिहावे लागतात. त्यांतील मुख्य शब्दांची याद. कांकूड, हींव, गांव, कोंकण, दंव, झोंप, टोंक, चोंच, पेंच सांपडणें, इत्यादि.

३४ उपसर्ग.

अति (पलीकडे) अतिशय.

अनु (मागून प्रमाणें जवळ) अनुक्रम, अनुकूल.

अभि (संमुखतां.) अभियोग.

अप (वाईट.) अपकार.

परि (सभोंवतें.) परिवार.

आ (मर्यादेपर्यंत) आबालवृद्ध.

स (संगतें, सोबे.) सपुत्र, सकर.

अ (निषेधवाचक.) अज्ञान.

कु (वाईट.) कुमार्ग.

निर् (अभाव) निर्जन. (विशेषें) निर्मुक्त.

३५ प्रत्यय.

त्व-ता (धर्मवाचक) धर्मशीलत्व. धर्मशीलता.

| | | |
|---|---|---|
| मान् } | (युक्त.) | श्रीमान्. |
| वान् } | | द्रव्यवान्. |
| आवह | (आणणारा) | हितावह |
| स्थ | (राहाणारा) | गृहस्थ |

३६ संस्कृत व इतर भाषेंतील कांहीं कठिण शब्द.

| | | |
|---|---|---|
| ईश्वर. | सर्वशक्तिमत्व. | निर्भेद्यता. |
| सूक्ष्मदर्शक. | स्थितिस्थापकता. | अपारदर्शकता. |
| विभाज्यत्व. | वातावरण. | परिमेयता. |
| सदाचरण. | निराकारता. | व्याकरण. |
| सर्वव्यापकता. | प्रकरण. | अनाद्यनंतता. |

| | | | |
|---|---|---|---|
| अनुक्रमणिका। इंद्रसख. | सिद्ध. | वनस्पति. | |
| राजसख. | क्रुद्ध. | अखात. | मेघराज. |
| ब्रह्म. | सिद्धि. | वनराज. | औषध. |
| समिद्ध. | देवराज. | ओषधि. | ऐच्छिक. |

## हिंदुस्थानी भाषेंतील.

| | | | |
|---|---|---|---|
| फडणवीस. | चिटणवीस. | बादशाह. | चोबदार. |
| मेहेरबान. | लश्कर. | बाहादूर. | तक्त. |
| तक्तपोशी. | सरदार | गर्दपोस. | मखमल. |
| फ़रनवीस. | हकीकत. | महसूर. | हिकायत. |
| खबरदार. | अकबार. | हाजर. | हजीरी. |
| हवाशीर. | दरबार. | अदालत. | शिलेदार. |
| नशिहत. | जवाहीर. | शिलेखाना. | दर्याफ्त. |
| अर्ज. | अर्जी. | मुनासब. | मुनसी. |
| मोलवी. | स्वार. | बारगीर. | जीन. |

সমাপ্ত.